# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २७/०९/२०२४ (शुक्रवार)

---

### नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा –२०२४

दरवर्षी प्रमाणे नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलात मा. श्री हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण दि. २५.०९.२०२४ ते २७.०९.२०२४ पर्यंत क्रिडा स्पर्धा नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालय, मैदान टेकानाका येथे आयोजित करण्यात आले होते. सलग ३ दिवस विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात आले होते. काही क्रिडा स्पर्धा क्रिडा संकुल मानकापुर येथे सुद्धा घेण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धे मध्ये चार संघ क्र .१ मुख्यालय संघ २. काटोल सावनेर संघ,३.नागपूर उमरेड संघ,४. रामटेक कन्हान संघ असे संघ होते.

**दि. २५.०९.२०२४** रोजी फुटबॉल, १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे ४०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे १५०० मीटर धावणे आणि ५ किमी धावणे अश्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. दुसऱ्या दिवशी **दि. २६.०९. २०२४** रोजी कबडडी, खोखो,बास्केट बॉल, रिले, १००X४, ४००X४, गोळा फेक, थाली फेक, भाला फेक अश्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तिसऱ्या दिवशी **दि. २७.०९.२०२४ रोजी** वॉलीबॉल सह १०० मीटर धावनेची अंतीम फेरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच सदर स्पर्धेचा समारोप कार्यक्रम बहुउद्येशीय हॉल पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण मध्ये ठेवण्यात आला होता. **सर्वाधिक पदके मुख्यालय संघाला मिळाले आहे**. विविध पोलीस अमंलदारानी अनेक स्पर्धेत पदक पटकवली आहे. सर्व विजेत्यांना मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले आहे. त्यांनतर सर्व अधिकारी व अंमलदारांना अल्पोपहाराचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

सदर समारोप कार्यक्रमात मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण तसेच मा. श्री विजय माहुलकर पोलीस उपअधिक्षक (गृह), सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर ग्रामीण जिल्हा, सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी व इतर पोलीस अधिकारी आणि अंमलदार सदर समारोप कार्यक्रमाला हजर होते.






**सर्वाधिक पदके** विजेता संघ पोलीस मुख्यालय

# तलवारीने केक कापणाऱ्या अरोपीवर अरोली पोलीसांनी केली कारवाई

पो.स्टे. अरोली :— दिनांक २५/०९/२०२४ चे २१:३० ते २३:०० वा. दरम्याण पोलीस स्टेशन अरोलीचे ठाणेदार स्नेहल राउत यांना माहीती प्राप्त झाली कि खरडा ते राजोली पांधन रस्त्यावर चार ते पाच मुले हे तलवारी ने केक कापत आहेत त्यानुसार सपोनि राउत पोस्टे स्टाफसह सदर ठिकाणी पोहचले. तेथे पोहचल्यावर त्यांना त्याठिकाणी ५ तरूण मुल मिळुन आले. तिथे चौकशी केल्यावर त्यांना माहिती मिळाली कि त्यापैकि एका मुलाचा वाढदीवस असल्याने त्याचा केक कापण्याकरीता आरोपी सतीश दुर्योधन शेंडे रा.खरडा यांने लोखंडी तलवार आणली होती. त्या तलवारीने केक कापुन वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी आरोपी सतीश दुर्योधन शेंडे याच्या सोबत ४ विधीसंघर्षग्रस्त बालक हजर होते. आरोपी सतीश दुर्योधन शेंडे याच्या ताब्यातुन **एक लोखंडी धातुची टोकदार तलवार तलवार किंमती २००/—रु तसेच विवो कंपनीचा अॅड्रॉइड मोबाइल कि. १०००० रु तसेच पोको कंपनीचे २ अॅड्रॉइड मोबाइल कि. २०००० रु असा एकुण ३०२०० रुपयाचा माल** पंचासमक्ष जप्त करण्यात आला. पोउपनि सुशिलकुमार सोनवाने पो.स्टे अरोली योंचे रिपोर्ट वरून **आरोपी नामे— १)सतीश दुर्योधन शेंडे वय २३ वर्ष रा. खंरडा सोबत ४ विधीसंघर्षग्रस्त बालकां** विरूद्ध पोस्टे अरोली येथे **कलम ४;२५; शस्त्र अधिनियम १९५९ सह कलम ३७(१)(अ),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक मा. श्री रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक स्नेहल राउत, पोलीस उपनिरीक्षक सुशिलकुमार सोनवाने, पोलीस हवालदार संदीप बाजनघाटे, पोलीस अंमलदार मनिष सुखदेवे, सचिन मुदनर, उमेश परसगाये, विक्की कोथरे, राकेश राउत यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध पो.स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

पो.स्टे. खापरखेडा :— दिनांक २६/०९/२०२४ चे १४.०० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या पथकाला गोपनीय सुत्राकडुन माहिती प्राप्त झाली कि पोस्टे खापारखेडा हद्दीत अवैध रेती वाहतूक सुरू आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या पथकाने खापरखेडा पोस्टे हद्यीत पेट्रोलिंग केली असता मौजा वलनी पिपळा रोड येथे टिप्पर चालक आरोपी नामे— दिपक लल्लुप्रसाद वर्मा वय ३० वर्ष रा. वार्ड न ६ वलनी ता. खापरखेडा हा आपल्या ताब्यातील **टिप्पर क्रमांक एम एच ४० एके ८५९५** मध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती अवैधरीत्या व विनापरवाना भरून चोरटी वाहतूक करतांना मिळुन आल्याने त्यास रेतीचे रॉयल्टीबाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून **टिप्पर क्रमांक एम एच ४० एके ८५९५** किंमती १५००,०००/—रू. व त्यामधील ०५ ब्रास रेती किंमती २००००/—रू. असा एकुण १५,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. आरोपी टिप्पर चालकाला विचारपुस केली असता सदर काम आरोपी क्र २ टिप्पर मालक नामे हसिफ उर्फ राजा बाबू अन्सारी वय ४० वर्ष रा वलनी खापरखेडा याच्या सांगण्यावरून केले आहे असे सांगीतले. दोन्ही आरोपीतांविरूद्ध पो.स्टे. खापरखेडा येथे फिर्यादी सफौ विनोद काळे ब.न २२३ स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या रिपोर्ट वरून कलम ३०३(२),३(५)४९ भा. न्याय. सं. सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधि. सहकलम ४,२१ खाण व खनिज अधि. सहकलम ३ संपत्ती नुकसान प्रति. अधि. ५०,१७७ महा.मो. वाहन अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे आंच्या आदेशान्वये सपोनि किशार शेरकि, सपोनि मनोज गदादे, सपोनि जिवन राजगुरू, पोउपनि बटटुलाल पांडे, सफौ विनोद काळे, पोहवा प्रमोद भोयर, पोहवा संजय बांते, पोना संजय बरोदीया, चालक पोहवा अमोल यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध पो.स्टे. भिवापुर पोलीसांची कारवाई

पो.स्टे. भिवापुर :— दिनांक २६/०९/२४ चे २२/०० ते २२/४० वा. दरम्यान पोस्टे भिवापुर ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल यांना गोपनीय सुत्राकडुन माहिती प्राप्त झाली कि भिसी वरुन नांद फाटा मार्गे वर्धा येथे एक भगवा रंगाचा त्यावरा काळया रंगाची त्रिपाल झाकलेला रेती भरलेला ट्रक जात आहे. यावरुन पंचासह नांद ते पांजरेपार फाटा येथे भिवापुर पोलीसांनी नाकाबंदी केली असता ट्रक क एम.एच .३२ ए.जेक्र५९३२, १६ चक्का चे चालक आरोपी क्र १ ज्ञानेश्वर प्रेमदास मैंद रा.रिंगरोड वॉटर टॅक अ टविनायक ले आऊट पिपरी वर्धा वय—३८ ने व आरोपी क्र २ क्लीनर राहुल विष्णुजी पुसाम रा. फत्तेपूर देवळी, देवळी वर्धावय—२८ वर्ष यांनी आपले ताब्यातील ट्रकमध्ये अंदाजे १२ ब्रास रेती कि. ६०,०००/—रु व ट्रक कि. ५०,०००००/—रु असा एकुण ५०,६०,०००/— रु अवैध्यरित्या बिनापरवाना शाशनाचा महसुल बुडवुन क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात रेती भरुन आरोपी क्र. ३) मोहसीन खान लियाकत खान पठान रा. जाकीर हूसेन कॉलनी मॉडस स्कुल नगर मार्ग वर्धा, चे सांगण्यावरुन चोरटी वाहतुक करताना मिळुन आले. आरोपीतांविरूद्ध पो.स्टे. भिवापुर येथे फिर्यादी किशोरकुमार राठीपालसिंग ठाकूर बं नं २४ यांच्या रिपोर्ट वरून कलम ३०३(२),४९,३(५) बी.एन.एस.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६/ ४८(७) ४८(८) खाण आणि खनिज (नियम आणि विकास ) अधिनियम ,१९५७/४,२१सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४/३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड मा. श्रीमती वृष्टी जैन यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापुर सहायक पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल, सफौ किशोर ठाकुर, पोहवा राकेश त्रिपाठी, पोलीस अंमलदार मनोज चाचेरे, दिपक ढोले, प्रितम खोपे यांनी पार पाडली.

## प्राणांकित अपघात

**पोस्टे बेला:—** अंतर्गत मौजा खातखेडा बस्टॉप जवळ दिनांक २५/०९/२४ चे १९/३० वा. दरम्यान यातील फिर्यादी बाबा भीमराव गेडाम वय ४० वर्षे रा. गीरड वार्ड नं ०१ ता समुद्रपुर जि. वर्धा याचा मित्र जखमी नामे जगदिश नामदेव गौरकर हा खातखेड बसस्टापकडे पायदळ जात असतांना सिर्सी कडुन खातखेडा कडे येणाऱ्या रस्त्यावर आरोपी **मृतक नामे —शेखर ज्ञानदेव नेहारे वय २९ वर्षे रा. भीवी ता. भीवापुर जि. नागपुर** याने आपले ताब्यातील **मोसा क्र एम.एच.४०.ए.एस.०७३२** वर मोसा भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन जखमी याला आमोरासमोर धडक दिली आणि आरोपी मोसा चालकाचा मोसावरून ताबा सुटल्याने त्याची मोसा स्लीप होवुन रोडवर पडल्याने त्याच्या_डोक्याला गंभीर मार लागुन मरण पावला आहे. जखमी याला सीर्सी येथे उपचाराकामी दाखल केले आहे.

सदर प्रकरण फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोस्टे बेला येथे आरोपी विरूध्द कलम १०६(१) , १२५(अ) , २८१ बी.एन.एस.सह कलम १८४ मो.वा. का. अन्वये गून्हा नोंद असून गुन्हयाचा पुढील तपास पो.उपनी बोळगीर पोलीस स्टेशन बेला मो. नं. ९७६५७७१९७७ हे करीत आहे.

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद.

**पो.स्टे. अरोली** :— दिनांक दि. २७/०९/२०२४ रोजी ७/२७ वा. च्या सुमारास पोलीस स्टेशन अरोली चे अधिकारी व स्टॉफ सह पोलीस स्टेशन अरोली हद्दीत प्ट्रोलींग करित असतांना अवैधरित्या देशी दारू विक्रीची मुखबीर द्वारे पक्की माहीती मिळाली कि अरोली येथे काही इसम अवैधरित्या दारूची विक्री करीत आहे. अश्या माहीतीवरून ठाणेदार सपोनि स्नेहल राउत पोस्टे स्टाफसह रेड कामी रवाना झाले असता अरोली येथील निखील बोरसरे याच्या पाणठेल्यावर रेड कारवाई करण्यात आली असता पाणठेल्याच्या छतावर एक इसम मिळुन आल्याने त्यास नाव गाव विचारले असता त्याने स्वत:चे नाव सुनिल पुनाराम बागडे, रा. अरोली असे सांगितले. पानठेल्याच्या छतावर झडती घेतली असता **कोंकण दारू संत्रा ९९९, ९० एम एस च्या ८० बॉटल मिळुन आल्या प्रती बॉटल ३५ रूपये प्रमाणे एकुण २८००/— रू. चा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. **निखील बोरसरे आणि सुनिल पुनाराम बागडे दोन्ही रा. अरोली** यांच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच अरोली येथील निवासी **दुर्गेश श्रावण येरणे** हे त्यांच्या घराजवळील एका विट सिमेंट च्या पक्कया बांधकाम केलेल्या खोलीतून अवैधरित्या देशी दारूची विक्री करित असल्याची गुप्त खबर मिळाल्याने स्टाफ सह त्या ठिकाणावर रेड टाकण्यात आली असता **देशी दारू भिंगरी संत्रा ९० एम एल च्या ८० प्रती बॉटल ३५ रूपये प्रमाणे एकुण २८००/— रू. चा मुद्देमाल जप्ती करून आरोपी दुर्गेश श्रावण येरणे** यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कारवाई मध्ये **एकुण ५६००/— रू. चा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत, स.पो.नि. ठाणेदार, पोलीस स्टेशन अरोली, नागपूर ग्रामीण पोउपनि सोनवने, पोहवा बाजनघाटे, पोशि राकेश, मुदनर, सुखदेवे, परसगाये, विक्की, मपोशि आश्विनी, शितल तसेच होमगार्ड यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**